India आशा

SHARP Program

School Home Applicable Remedial Program

INDEEA

Inter National Development of Excellent Education Academy



# आशा फौंडेशन: 2022-23

## सहामाहीक प्रगती अहवाल

# शार्प प्रकल्प

## SHARP – School & Home Applicable Remedial Program




**आशा फौंडेशन हि शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारी संस्था आहे. शिक्षण, आरोग्य, नागरी कर्तव्ये या तीन मुख्य उद्देशाने आशा फौंडेशन कार्यरत आहे.**

संस्थेतर्फे जळगाव शहरातील प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिर आणि शकुंतला जे. माध्यमिक विद्यालयातील ई. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी शार्प प्रकल्प विनामूल्य राबविण्यात येतो. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना उपचारात्मक शिक्षण देणे त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आणणे आणि त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करण्याच्या उद्देशाने शार्प प्रकल्प राबविण्यात येतो. मराठी व गणित या विषयावर आधारित विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेऊन आलेल्या निकालानुसार त्यांना शार्प प्रकल्पात समाविष्ट केले जाते. कोरोना महामारीमुळे सर्वच विद्यार्थी अभ्यासात मागे आहे असे निदर्शनास आले. निवड चाचणीमुळे विद्यार्थी कोणत्या विषयात मागे आहे, त्याची लेखन वाचन व आकलन क्षमता कशी आहे हे लक्षात आले म्हणून दोन्ही शाळातील सर्व विद्यार्थी शार्प प्रकल्पात समाविष्ट केले. एकूण ८२ विद्यार्थी निवड चाचणीस उपस्थित होते.

प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :

हिरक प्रायोजकत्व
श्री. भटू ठाकरे

रौप्य प्रायोजकत्व
श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे



# तासिका कालावधी

शाळेने दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक शाळेत आठवड्यातून दोन दिवस तासिका घेतल्या जातात.

**निवडचाचणीनुसार निरीक्षणे - विषय - मराठी**

**३५%** विद्यार्थ्यांना शब्द जसेच्या तसे लिहिता आले नाही.

**७९%** विद्यार्थ्यांना अनेकवचन आले नाही.

**८३%** विद्यार्थ्यांना समानार्थी शब्द लिहिता आले नाही.

**७७%** विद्यार्थ्यांना विरुद्धार्थी शब्द लिहिता आले नाही.

**६८%** विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे लिहिता आले नाही.

**७८%** विद्यार्थ्यांना निबंध लिहिता आला नाही.






**निवडचाचणीनुसार निरीक्षणे विषय - गणित**

**५९%** विद्यार्थ्यांना लहान मोठी संख्या ओळखता आली नाही.

**४५%** विद्यार्थ्यांना बेरीज आली नाही.

**८८%** विद्यार्थ्यांना गुणाकार आले नाही.

**६२%** विद्यार्थ्यांना वजाबाकी आली नाही.

**१००%** विद्यार्थ्यांना भागाकार आले नाही.

**५७%** विद्यार्थ्यांना घड्याळ समजले नाही.

**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व** — **श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व** — **श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



# इतर निरीक्षणे

- वैयक्तिक स्वच्छता, नीटनेटकेपणाचा अभाव
- पौष्टिक आहाराबाबत उदासीनता
- सामान्यज्ञानाविषयी अनास्था तसेच संस्कारमूल्यांची वानवा
- लेखन वाचन मूलभूत गणितीय कौशल्य कमतरता
- विद्यार्थ्यांच्या मानसिक व वर्तणुकीतील समस्या
- बोलणे / व्यक्त होण्याबाबत भीती
- गैरहजेरीचे प्रमाण जास्त
- अक्षरे / अंक उलट लिहिणे, मराठी आणि इंग्रजी अंकांची सरमिसळ करणे.

**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व**
**श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व**
**श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



# अभ्यासक्रम नियोजन



**गणित -** अंक ओळख , अंकी / अक्षरी लिहिणे वाचणे. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, पाढे , लहान मोठी संख्या ओळखणे , सम विषम संख्या ओळखणे, चढता क्रम-उतरता क्रम ओळखणे , आकार ओळखणे ई. क्रिया पहिल्या सहामाहीत शिकवल्या.

**मराठी -** स्वर व्यंजन ओळख, बाराखडी लिहिणे वाचणे, कानामात्रा वेलांटीचे शब्द लिहिणे वाचणे, समानार्थी - विरुद्धार्थी शब्द, अनेकवचन, गटात न बसणारे शब्द ओळख, शब्द खेळ, शब्दाचे झाड बनवणे, शब्दांची अंताक्षरी, म्हणी, निबंधाचे प्राथमिक स्वरूप ई. प्रकार शिकवले.






**सामान्यज्ञान -** रंग, फळे, फुले, फळभाज्या, पालेभाज्या ओळखणे. आठवड्याचे वार, पाळीव प्राणी, दिन विशेष, मराठी महिने, वातावरण, हवामान, जलचक्र, देश, राज्य, जिल्हा ई. घटक शिकवले.

प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :

हिरक प्रायोजकत्व
श्री. भटू ठाकरे

रौप्य प्रायोजकत्व
श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे



## स्पर्धा व उपक्रम

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा, लेखन वाचन व हस्त कौशल्य विकसित होऊन त्यांच्यातील कल्पकता वाढीस लागावी म्हणून राखी बनवणे व गणेशोत्सवानिमित्त' शिक्षणाचे महत्व' या विषयावर हस्ताक्षर स्पर्धा व 'बाप्पाची माहिती' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.





**पालकसभा**

प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिर येथे आयोजित पालकसभेत आशा फौंडेशनच्या कार्यकारी संचालिका सुजाता बोरकर यांनी पालक पाल्य संवाद याविषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्याने शाळेत घडणाऱ्या घटना पालकांना मोकळेपणी सांगाव्यात व पालकांनीही वेळ काढून पाल्याशी विविध विषयावर चर्चा करावी असे संवादाचे महत्व बोरकर यांनी सांगितले.

**सेमिनार**

प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिर येथे आयोजित सेमिनार आशा फौंडेशनच्या कार्यकारी संचालिका सुजाता बोरकर यांनी अभ्यासाचे महत्व व अभ्यास पद्धती याविषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विषय समजून पाठांतर करणे, शुद्धलेखन, वाचन, सराव ई गोष्टींची अभ्यासातील आवश्यकता त्यांनी विद्यार्थ्यांना समजावली.



**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व** — **श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व** — **श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



# शार्प प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये घडलेला सकारात्मक बदल

**स्वच्छतेच्या सवयी -** विदयार्थी शाळेत येताना अस्वछ, तयारी न करता येत. त्यांना चांगल्या वाईट सवयींचे फायदे तोटे समजावले. नियमित नखे कापणे, केस विंचरणे, स्वच्छता ठेवणे, गणवेश परिधान करणे या सवयी लावल्या. त्यामुळे विद्यार्थी शाळेत येताना नीटनेटके येऊ लागले.






**आहार विषयक जागृती -** नियमित जेवण करण्याचे तसेच शाळेतील मध्यान्ह भोजनाचे महत्व व फायदे समजावले. पौष्टिक अन्न तसेच कुरकुरे , मॅगी ई. जंकफूड यातील फरक समजावला.

**संस्कारमूल्ये -** विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक बनावे व आदर्श व्यक्ती म्हणून त्यांची जडणघडण व्हावी यासाठी त्यांना संस्कारमूल्ये शिकवली. थोरामोठ्यांचा आदर करावा, त्यांना नमस्कार करावा, खोटे बोलू नये, सकाळी लवकर उठावे, नियमित वेळेवर शाळेत यावे ई. संस्कारमूल्ये गोष्टीरूपाने शिकवले.





**मानसिक समस्या व अडचणी समजून घेतल्या** पालक नसणे/ एकल पालक असणे, वसतिगृहात/ निरीक्षणगृहात राहणे, गोंधळलेली मनस्थिती, घरातील दारिद्र्य, शैक्षणिक साहित्य नसणे यामुळे विद्यार्थ्यांचे सुरुवातीला अभ्यासात लक्ष नव्हते त्यांना मायेने जवळ घेऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या व त्यांना अभ्यासाची गोडी लावली. त्यांना शाळेत हजर राहण्यास प्रोत्साहन दिले.

**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व** — **श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व** — **श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



# शार्प प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये घडलेला सकारात्मक बदल

**विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीतील बदल-** विद्यार्थ्यांची बोली भाषेची अडचण, उच्चार, आरडाओरडा करणे, नखे खाणे, कागद फाडणे, कचरा करणे ई. सवयी बदलल्या. विद्यार्थ्यांशी वैयक्तिकरित्या जवळीक साधून विविध उदाहरणे व गोष्टी सांगून त्यांच्या वाईट सवयी कमी करण्याचा प्रयत्न करत आहोत. इतरांना मदत करणे, सभाधीटपणे बोलणे हे बदल दिसून येतात.





**स्पर्धा व उपक्रम आयोजनाने कौशल्य विकसन -** गणेशोत्सवानिमित्त हस्ताक्षर स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेनंतर विद्यार्थ्यांना बोलण्याचा, स्वतःहून उत्तर देण्याचा तसेच चर्चेत सहभागी होण्याचा सराव झाला, लिखाणाचा सराव करण्याची सवय लागली. त्यांच्यातील भीती कमी झाली.

**शिस्त व अभ्यास यांची अनोखी सांगड -** विद्यार्थ्यांना शिस्त लागावी म्हणून नियमित गोंधळ करणाऱ्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था बदलली. गोंधळ घातल्यास त्यांना पाढे पाठांतर, वाचन, एखादा मुद्दा देऊन उस्फुर्त बोलण्यास सांगणे, उठाबशा काढणे या पर्यायांची सक्ती केली.



**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व**
**श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व**
**श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



## शाळांचे सहकार्य

शार्प प्रकल्प चांगल्यारितीने कार्यान्वित रहावा म्हणून प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिर तसेच शकुंतला जे माध्यमिक विद्यालय या शाळांचे संस्थाचालक, प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सौ. सुनिता बोढरे , शकुंतला जे माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. राजश्री महाजन तसेच दोन्ही शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांचे उत्तम सहकार्य लाभत आहे. शाळेतील शिक्षक, पालक तसेच शार्प प्रकल्प प्रशिक्षिका यांच्यात वेळोवेळी घडणारा संवाद व सामंजस्य उल्लेखनीय आहे.



**सांख्यिकी**

| अ. क्र. | उपक्रम | संख्या / उपस्थिती |
|---|---|---|
| १ | जुलै ते ऑक्टोबर २०२२ प्रशिक्षण | १०२ तास |
| २ | पालकसभा | ११० |
| ३ | राखी बनवणे | ५२ |
| ४ | स्पर्धा व बक्षीस वितरण | ५६ |
| ५ | सेमिनार | ७० |

प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :
हिरक प्रायोजकत्व
श्री. भटू ठाकरे
रौप्य प्रायोजकत्व
श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे

# अभिप्राय

### प्रतिभा प्राथमिक विद्यामंदिर, जळगाव.

आशा फौंडेशन या संस्थेतर्फे सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शार्प प्रकल्प सुरु करण्यात आला. ई. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्यातून २ तासिका घेण्यात येतात. सर्व विद्यार्थी प्रशिक्षकांची वाट बघतात. संवाद कौशल्य व शिकवण्याची वेगळी पद्धत यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागली. पालक सभा , स्पर्धा या विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते. विद्यार्थी आनंदी असतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हायला होतो. बोरकर मॅडमला सर्व विद्यार्थी ओळखतात व त्यांची तासिका परत व्हावी असे मनोगत व्यक्त करतात. शार्प उपक्रम मोठ्या प्रमाणात इतर शाळेतूनही सुरु व्हावा असे वाटते. उपक्रम आयोजकांना खूप खूप धन्यवाद !

**- सौ. सुनीता बोढरे, मुख्याध्यापिका**

### शकुंतला जे. माध्यमिक विद्यालय, जळगाव.

आमच्या शाळेत आशा फौंडेशनच्या शार्प प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ झाली आहे. निरागस, गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनात आशेचा नवीन किरण घेऊन सामाजिक भावनेने खूप चांगले कार्य संस्थेच्या माध्यमातून होत आहे. आमच्या शाळेतील ५ वी च्या विद्यार्थ्यांना अजूनही अंक ओळख, बेरीज, वजाबाकी, सम विषम संख्या, लहान मोठी संख्या या संकल्पना समजत नव्हत्या. शार्पच्या माध्यमातून त्यांना गणितीय संकल्पना समजायला लागल्या. स्पर्धा, बक्षिसे यातून त्यांना प्रोत्साहन व अभ्यासाची प्रेरणा देणारी एकमेव संस्था आशा फौंडेशन व शार्प प्रकल्प आहे. शार्प तासिकेच्यावेळी मी स्वतः उपस्थित असते विद्यार्थ्यांमधील सकारात्मक बदल मला पाहायला मिळतो. विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढवून त्यांना उभे राहून बोलायला शिकवणारी आशा फौंडेशन ही एकमेव संस्था आहे. शार्प या चांगल्या उपक्रमासाठी आमच्या शाळेची निवड केली याबद्दल संस्थेचे व आयोजकांचे खूप आभार !

**- सौ. राजश्री महाजन, मुख्याध्यापिका**

**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व** — **श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व** — **श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**



## शार्प प्रकल्पाची मागणी व गरज

कोरोना महामारी व्यत्ययानंतर विद्यार्थ्यांची अभ्यासातील गती कमी झाली तसेच लेखन व वाचन कौशल्यातील कमतरतेमुळे शार्प प्रकल्पाची गरज अधोरेखित होते. कोरोना महामारीच्या आधी ज्या शाळांमध्ये शार्प प्रकल्प सुरु होता त्या सर्व शाळांनी शार्प प्रकल्पाची मागणी केली आहे.

## आवाहन

समाजातील समस्येवर उपाय म्हणून आशा फौंडेशनतर्फे शार्प प्रकल्प विनामूल्य राबविण्यात येतो. गरीब, वंचित व अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी आयोजक कार्यरत आहेत.

शार्प प्रकल्पाची मागणी व गरज लक्षात घेऊन अधिक जोमाने हा प्रकल्प पुढे नेता यावा यासाठी समाजाने आमच्या पाठीशी उभे राहावे.

**शार्प प्रकल्प एका शाळेतील एका वर्गात एका शैक्षणिक वर्षात राबविण्यासाठी साधारणतः एकूण रु. ७५,०००/- इतका खर्च येतो. प्रकल्पाची गरज व मागणी यास अनुसरून प्रकल्पासाठी हिरक प्रायोजकत्व रु.१,००,०००/-, अमृत प्रायोजकत्व रु. ७५,०००/-, सुवर्ण प्रायोजकत्व रु.५०,०००/-, रौप्य प्रायोजकत्व रु.२५,०००/- स्विकारावे. वाढदिवस, वर्धापनदिन, स्मृतिदिन इ. दिवसाची आठवण म्हणून या थोर कार्यास उदात्तपणे मदत करून पुढील पिढी उज्वल व्हावी यासाठी हातभार लावण्याचे आवाहन करत आहोत. त्यास सकारात्मक प्रतिसाद द्यावा ही विनंती.**

विविध कंपन्या/संस्था यांनी त्यांच्या सी. एस. आर. ॲक्टिव्हिटीमधून या प्रकल्पास निधी उभारून द्यावा तसेच दानशूर व्यक्तिंनी देणगी देऊन अर्थसहाय्य करावे. **आपण दिलेल्या देणगीला आयकर कायदा ८० जी अंतर्गत कर सवलत मिळेल.** समाजाने दिलेल्या अर्थसहाय्याचा उपयोग समाज उभारणीच्या कार्यासाठी होईल.

**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

| हिरक प्रायोजकत्व | रौप्य प्रायोजकत्व |
|---|---|
| **श्री. भटू ठाकरे** | **श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे** |



| | |
|---|---|
| **मार्गदर्शक :-** | **श्री. संजीव दहिवदकर, श्री. राजेंद्र पाटील, सौ. अश्विनी देवरे** |
| **विशेष सहकार्य :-** | **श्री. भटू ठाकरे, श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे** |
| **कार्यकारी संचालक :-** | **सुजाता बोरकर** |
| **समुपदेशक :-** | **सौ. लिना जैन** |
| **शार्प प्रशिक्षिका :-** | **सौ. योगिता पाटील, सौ. रश्मी शिरसाठे, सौ. कल्पना शिंपी** |

## संपर्क - आशा फौंडेशन


**ठाणे कार्यालय -**

फ्लॅट नं ६ , तिसरा मजला,
होशबानू मॅन्शन, गोखले रोड,
नौपाडा, ठाणे ( प ) – ४००६०२

**पुणे कार्यालय -**

बी ४०१ , चौथा मजला,
ग्लोरटेक आय. टी. पार्क,
मराठा मंदिर मागे, सर्वे नं २२,
एल. एम. डी. चौक,
बावधन(खु.), पुणे - ४११०२१

फोन नं - ०२० - ६७९९८५००

**जळगाव कार्यालय -**

प्लॉट नं ५२ , आदर्श नगर,
मोहाडी रोड, श्री स्वामी समर्थ
केंद्रासमोर, जळगाव - ४२५००2

मो. नं - ९८२३६५४८११


| | |
|---|---|
| **ई-मेल :-** | sujatab@indiaasha.org, borkarsk@gmail.com |
| **संकेतस्थळ :-** | http://www.indiaasha.org |


**प्रायोजकांचे मन:पूर्वक आभार :**

**हिरक प्रायोजकत्व**
**श्री. भटू ठाकरे**

**रौप्य प्रायोजकत्व**
**श्री. अरुण कांदेकर, श्री. राकेश शिरसाठे**


